सत्यमेव जयते
महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.
९३, मल्हार पेठ, सातारा.
दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५
ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in
पुण्यश्लोक 300

जा.क्र/जिवानिशा/वाहतुक अधिसुचना/४२५/२०२६ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक – ११/०९/२०२६

# अधिसुचना

मेढा पोलीस ठाणे हद्दीतील कास पुष्प पठारावरील फुलांचा हंगाम दि. ०१/०९/२०२६ ते ३१/१०/२०२६ या कालावधी असुन कास पुष्प पठारावर येणाऱ्या पर्यटकाची मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. तसेच सातारा कडुन बामणोली कडे व कास धरणाकडे जाणेचा मार्ग हा कास पुष्प पठारावरुन असलेने कास पुष्प पठारावरील फुलांचा हंगामा मध्ये कास पुष्प पठार परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतुक कोडींची समस्या होते. त्यामुळे पर्यटकाना व वाहन चालकाना नाहक त्रास होत असलेने कास पुष्प पठार परिसरातील वाहतुक कोंडी टाळण्याकरीता कास पुष्प पठारावरील वाहतुक मार्गावर एकेरी वाहतुक करणे आवश्यक असलेने त्याबाबतची अधिसुचना प्रसिद्ध करणेत येत आहे.

मी निखील पिंगळे भापोसे, पोलीस अधीक्षक सातारा, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये कास पुष्प पठारावरील फुलांचा हंगामामध्ये कास पुष्प पठार परिसरात वाहतुक व्यवस्था सुरळीत राहणेकरीता दि. १२/०९/२०२६ चे ००.०१ ते ३१/१०/२०२६ चे २३.५९ वा. पर्यत दर शनिवार व रविवार तसेच इतर शासकीय सुट्टयाच्या दिवशी खालीलप्रमाणे अधिसुचना पारित करीत आहे.

## वाहतुक मार्गातील बदलाबाबत

## वाहतुक मार्गातील बदल - खालीलप्रमाणे बदल करणेत आला आहे.

१. साताऱ्याकडुन कास पुष्प पठार व बामणोली बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक ही सातारावरुन घाटाईदेवी मंदीर फाटा - वाहनतळ क्र. ०१ - घाटाई देवी मंदीर - वाळुंजवाडी - - कास धरण व बामणोली कडे जाईल.

२. बामणोली व कास धरण कडुन सातारा बाजुकडे येणारी सर्व प्रकारची वाहतुक ही बामणोली - कास धरण बाजुने - वाहन तळ क्र.०२ - कास पुष्प पठार - घाटाईदेवी मंदीर फाट्यावरुन सातारा कडे जाईल.

तरी वरील वाहतुक ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतुक मार्गात केलेल्या बदलांसाठी सर्व नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसुचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दिनांक ११/०९/२०२६ रोजी जारी करण्यात आली आहे.

SUPDT. OF POLICE SATARA

(निखील पिंगळे) भापोसे
पोलीस अधीक्षक सातारा

ठिकाण - सातारा
दिनांक - ११/०९/२०२६

Scanned with CamScanner

प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे

२/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.

३) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.

४) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता,लोकमत, तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार, पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी

५) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, सोलापूर ग्रामीण, सांगली, कोल्हापूर.

२/- सदर आदेशाची प्रसिध्दी आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक वृत्तपत्रामध्ये करणेस विनंती.

६) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.

७) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

<u>प्रत माहीतीसाठी सादर</u>

८) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.

९) मा.जिल्हाधिकारी सातारा.

१०) मा. उपवनसंरक्षक, वन विभाग, सातारा

Scanned with CamScanner